**महाराष्ट्र शासन**
उच्च शिक्षण संचालनालय
## शिक्षण शुल्क समिती,मुंबई
( विनाअनुदानीत व कायमविनाअनुदानीत शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता–शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई–४०० ००१
E-mail :- sssbedmed@gmail.com / jd.hesss-mh@gov.in Tel -022 22694478 Web-www.sssmumbai.org

---

शिशुस/शु.नि.अर्ज./२०१७/ ४८४ दि.०८.०५.२०१७

प्रति,

सर्व प्राचार्य/विभाग प्रमुख,
राज्यातील विशेष बी. एड. व एम. एड. अभ्यासक्रम महाविद्यालये/विद्यापीठ केंद्र

**विषय:–विशेष बी. एड. व एम. एड. अभ्यासक्रम महाविद्यालये/विद्यापीठ केंद्र मधील शैक्षणिक वर्ष २०१६–१७ च्या प्रवेशीत विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क निश्चितीबाबत.**

**संदर्भ:–१.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.समिती २०१५/प्र.क्र. ४३४/भाग–१/मशि–२, दि.२३.१२.२०१६**
**२.दि.२६.०४.२०१७ च्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

संदर्भांकीत शासन पत्रान्वये शिक्षण शुल्क समितीच्या कार्यकक्षेमध्ये भारतीय पूनर्वास परिषदेची मान्यता असणा–या व कायम विनाअनुदान तत्वार बी.एड. विशेष शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम चालविणा–या अध्यापक महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निश्चित करण्याची बाब समाविष्ट करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार शिक्षण शुल्क समितीच्या कार्यकक्षेमध्ये भारतीय पूनर्वास परिषदेची मान्यता असणा–या कायम विनाअनुदान तत्वावर बी.एड. विशेष शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम चालविणा–या अध्यापक महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निश्चितीसाठी तयार करावयाची नियमावली व निर्धारण नमुना अर्ज तयार करण्याबाबत या कार्यालयामार्फत समिती गठीत करण्यात आली होती. या समितीमार्फत शिक्षण शुल्क निश्चितीसाठी नियमावली व निर्धारण नमुना अर्ज तयार करण्यात आला. यावर सूचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. राज्यातील विशेष बी. एड. अभ्यासक्रम चालविणा–या महाविद्यालयांना भारतीय पूनर्वास परिषदेच्या सद्यस्थितीतील नियमांनुसार समितीने होणा–या खर्चानुसार शिफारस शुल्क २०१६–१७ यावर्षी प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यांकरिता भारतीय पूनर्वास परिषदेच्या सद्यस्थितीतील नियमांनुसार ठरावीक शुल्क शिफारस केली होती.

दि.२६.०४.२०१७ रोजी मा. अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा मा. अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीत बी.एड. विशेष शिक्षण अभ्यासक्रम चालविणा–या अध्यापक महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निश्चितीसाठी तयार करण्यात आलेल्या नियमावली व निर्धारण नमुना अर्जास मान्यता देण्यात आली. व प्रस्ताव २०१७–१८ या शैक्षणिक वर्षात प्रवेशीत विद्यार्थ्यांकरिता ३१मार्च, २०१७ च्या लेखापरिक्षण अहवालानुसार मागविण्याचे ठरले. तसेच राज्यातील विशेष बी. एड. अभ्यासक्रम चालविणा–या महाविद्यालयांना भारतीय पूनर्वास परिषदेच्या सद्यस्थितीतील नियमांनुसार ठरावीक शुल्क मान्य करणेबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला:–

**समितीने २०१६-१७ चे प्रवेशीत विद्यार्थ्यांकरिता दोन वर्ष विशेष बी. एड. अभ्यासक्रमासाठी रू. १,२४,७६८/- प्रति विद्यार्थी एवढे शुल्क २५ विद्यार्थ्यांच्या वर्गाकरिता व रू. १,०३,९७३/- प्रति विद्यार्थी एवढे शुल्क ३० विद्यार्थ्यांच्या वर्गाकरिता तसेच बी. एड. विशेष अभ्यासक्रमासोबत महाविद्यालयात चालविण्यात येणाऱ्या दोन वर्ष विशेष एम. एड. अभ्यासक्रमासाठी रू.८८,४९५/- प्रति विद्यार्थी एवढे शुल्कास अभ्यासक्रमाचे शुल्क म्हणून मान्यता देण्यात आली. हे शुल्क महाविद्यालयांनी समप्रमाणात विभागून दोन वर्षात आकारावे.**

Bhamdhai

**JOINT DIRECTOR**
**SHIKSHAN SHULKA SAMITI**
**MUMBAI**